IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# शेतकऱ्यांच्या विकासात करार शेतीचे महत्व

**डॉ. ढास डी. के.**
**अर्थशास्त्र विभागप्रमुख**
**प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय नेकनूर,ता. जि. बीड**

**सारांश :**

प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील जवळ-जवळ ७० टक्के लोकसंख्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे; तसेच देशातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्याची क्षमता कृषी क्षेत्रामध्ये आहे. भारतीय शेतीच्या संदर्भात महात्मा गांधी यांनी भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे. असे म्हटले आहे.

शेती हा भारतीयांचा आत्मा असून देखील शेती मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चित येते व त्यामुळे शेतकरी कुटुंबाना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. करार शेतीमुळे शेतकरी व माल विकत घेणारी कंपनी यांच्यात ठरलेल्या किमतीने उत्पादित शेतमाल विकत घेण्याचा करार झाल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नात निश्चितता प्राप्त होते. तसेच करार शेतीमुळे शेतकऱ्यांना शेती आदाने व मार्गदर्शन मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होते त्यामुळे करार शेती शेतकऱ्यांच्या विकासात महत्वाची आहे.

**मुख्य शब्द : करार शेती संकल्पना, करार शेतीचे महत्व**

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून भारतीय लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील जवळ-जवळ ७० टक्के लोकसंख्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे तसेच देशातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्याची क्षमता कृषी क्षेत्रामध्ये आहे. भारतीय शेतीच्या संदर्भात महात्मा गांधी यांनी भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे. असे म्हटले आहे. शेती हा भारतीयांचा आत्मा असून देखील शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात अनिश्चित येते व त्यामुळे शेतकरी कुटुंब अनेक आर्थिक संकटाना तोंड देते.

शेती सुधारणाचा एक भाग म्हणून करार शेतीकडे पहिले जाते. करार शेतीमध्ये शेतमाल उत्पादन करणारा शेतकरी व शेतमाल खरेदीदार यांच्यात शेतमाल खरेदी विक्री संदर्भात करार झालेला असतो व दोघांना मान्य असतो. करार शेतीमुळे शेतकऱ्यांना निश्चित भाव व बाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात शाश्वतता निर्माण होते व त्यामुळे शेतकऱ्यांचा विकास घडून येण्यास मदत होते.

**अभ्यासाचे उद्दिष्टे :**

१. करार शेती संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. शेतकऱ्यांच्या विकासात करार शेतीचे महत्व अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

सदरचा संशोधन लेख लिहिण्यासाठी व्दितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी विविध अहवाल, पुस्तके, संशोधन लेख, अप्रकाशित प्रबंध, वर्तमान पत्रातील लेख व माहिती तसेच संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

**विश्लेषण :**

**करार शेतीची संकल्पना**

उत्पादक शेतकरी व खरेदीदार कंपनी यांच्यामध्ये शेतमाल उत्पादन, गुणवत्ता, दिल्या जाणाऱ्या सेवा व उत्पादित झालेल्या शेतमालांच्या खरेदी विक्री संदर्भात जो करार करून शेती करण्यात येत त्याला 'करार शेती' असे म्हटले जाते. करार शेतीचे त्यांच्या स्वरूपानुसार वेगवेगळे प्रकार पडत आहेत.

**शेतकऱ्यांच्या विकासात करार शेतीचे महत्व**

भारत हा कृषी प्रधान देशअसल्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त असून त्यामध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणावर आहेत. परंतु हमीभाव व बाजारपेठेच्या अभावामुळे शेतकऱ्यांच्या विकासात अडचणी येत आहेत. या अडचणी कमी करण्यासाठी शेती सुधारणेचा भाग म्हणून करार शेतीकडे पहिले जाते. ग्रामीण भागातील शेतकरी विविध कारणामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्याचे दिसून येते. शेती निसर्गावर अवलंबून असून काही वेळा उत्पादन होत नाही तर काही वेळा झालेल्या उत्पादनाला भाव मिळत नाही. करार शेतीमुळे बाजारपेठ व भाव याबाबत स्थिरता आल्यामुळे शेतकऱ्यांच्या विकासात खालीलप्रमाणे फायदे होत आहेत.

**१. उत्पादन साधनांचा पुरवठा**

चांगल्या प्रतीचे बी बियाणे, खते, औषधे हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. सामान्य शेतकरी बाजारपेठेतून या गोष्टी विकत घेतात त्यावेळी त्यांची फसवणूक होण्याची शक्यता असते. करार शेती केल्यामुळे या सर्व गोष्टींचा शेतकऱ्याला खरेदीदार कंपनीमार्फत पुरविण्यात येतात त्यामुळे शेतकऱ्यांना शेती आदाने योग्य किमतीत, योग्य वेळी व चांगल्या प्रतीचे प्राप्त होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होवून त्यांच्या उत्पादनात भर पडते.

**२. उत्पादन करण्याविषयी मार्गदर्शन व सल्ला**

करार शेतीमध्ये उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर खरेदीदार कंपनीमार्फत वेळोवेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते; त्यामुळे शेतकऱ्याला आपल्या पिकासंदर्भात योग्य निर्णय घेणे शक्य होते व त्यामुळे उत्पादनात वाढ होते.

**३. कर्ज पुरवठा**

करार शेतीमध्ये करारानुसार शेतकऱ्यांचे उत्पादन होईपर्यंत शेतकऱ्यांना खरेदीदार कंपनीमार्फत कर्ज पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जे घेण्यासाठी येणाऱ्या अडचणी कमी होतात व ग्रामीण शेतकऱ्यांची सावकार पाशातून देखील मुक्तता होते.

**४. नवीन तंत्रज्ञानाची ओळख व वापर**

करार शेतीमुळे शेतकऱ्याने कंपनी बरोबर करार केला असल्यामुळे तसेच कंपनीकडून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोहत्सान दिले जात असल्यामुळे शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख होते व वापर करण्याचा प्रयत्न केला जातो.

**५. उत्पादकतेत वाढ**

करार शेतीमध्ये कंपनीमार्फत शेतकऱ्यांना उत्पादन साधनांचा पुरवठा, उत्पादन करण्याविषयी मार्गदर्शन व सल्ला, कर्ज पुरवठा इत्यादी गोष्टी महत्वाच्या वेळी दिल्या जात असल्यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ होते व त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होवून शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासास मदत होत आहे.

**५. हमी भाव**

करार शेतीमध्ये शेतकरी व खरेदीदार यांच्यात उत्पादित शेतमाल विशिष्ट किमतीने खरेदी विक्री करण्याविषयी करार झालेल्या असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला हमीभाव मिळते व शेतकऱ्यांचे शेतमालाच्या किमतीतील चढ उतारामुळे होणारे नुकसान कमी होत.

**६. निश्चित बाजारपेठ**

करार शेतीमध्ये शेतकरी व खरेदीदार यांच्यात उत्पादित माल विशिष्ट किमतीने खरेदी विक्री करण्याविषयी करार झालेल्या असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला एक निश्चित बाजारपेठ मिळते त्यामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ शोधण्याची गरज पडत नाही. तसेच खरेदीदार कंपनी मार्फत नवीन बाजारपेठांचा शोध घेतला जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादित मालासाठी नवीन बाजारपेठा उपलब्ध होतात.

**७. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ**

करार शेतीमुळे शेतमालाला हमीभाव व बाजारपेठ मिळत असल्यामुळे शेतकरी निश्चित राहून उत्पादन करतात व उत्पादन करार कंपनी ठरलेल्या किमतीने खरेदी करते त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत आहे.

करार शेतीचा विविध देशात प्रयोग करण्यात येत असून करार शेतीचे वेगवेगळे प्रकार देखील आहेत. भारतात देखील करार शेती काही प्रमाणात करण्यात येत. करार शेतीचे काही दोष असले तरी करार शेतीमुळे

शेतकऱ्यांची विविध समस्यातून सुटका होऊन त्यांचा विकासाला हातभार लागत आहे. करार शेती संदर्भात नवीन संशोधन करून शेतकऱ्यांच्या दृष्टीने करार शेती कशी फायदेशीर ठरेल याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**


१. कायंदे पाटील जी.वि. (२००३), कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स्, नाशिक

२. कविमंडन व्ही. (२००६), कृषी अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

३. चव्हाण एन एल (२००९), भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन्स्, जळगाव

४. गायकवाड एम. (२०१२), करार आणि कंपनी शेती , गोडवा कृषी प्रकाशन , पुणे

५. तिवारी डी.( २०२३), शेतकऱ्यांसाठी करार शेती , ॲग्रो वर्ल्ड

६. Ramesh P., N. R. Panwar A. B. Sing S. Ramana, Sushil Kumar Yadav, Rahul Shrivastava, and A. Subba Rao (2011) Status of Organic Farming in India, Web

७. Rajendra Madhav Wagh (2016 ),Contract Farming Practice In India: A Review, International Archive of Applied Sciences and Technology, Vol 7(3)

९. Dr. Bairagya Ramsundar & Sarkar Shubhabrata(2014), Problems and Prospects of Contract Farming In India, Global Journal of Commerce and Management Perspective,Vol.3(6):12-17